# सहशैक्षणिक विभाग कार्यवृत्तांत

## राष्ट्रीय सेवा योजना-वार्षिक अहवाल

कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर का. हे अत्यंत दूर्गम अशा खेड्यात अस्तित्वात आहे. जवळपास चोहीबाजूने ४० किमी. परिसरात एकही मोठे शहर अथवा तालुक्याचे ठिकाण नाही त्यामुळे शैक्षणिक सुविधा येथे परिपूर्ण नाहीत, तिथे इतर बाबींचा विचारच करण्यासारखी अवस्था नाही.

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा अत्यंत सक्षम विभाग आहे. या ठिकाणी ग्रामोद्धाराचे कार्य म. गांधीजींची व माजी. खा. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांच्या प्रेरणेतून चालु आहे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार मिळाला आहे.

चालु शैक्षणिक वर्षात रासेयो विभागात इच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आणि रितसर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे नियिमित उपक्रम चालू झाले.

दि. २८ मे ते ३ जून या कालावधीत आव्हान चान्सेलर्स ब्रिगेड हे आपत्ती व्यवस्थापन शिबीर श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई येथे पार पडले. या शिबीरात महाविद्यालयातील विद्यार्थी अशोक केदार व सचिन नेटके यांनी सहभाग नोंदवला व उत्कृष्ट कार्य केले.

महाविद्यालयाच्या वतीने या विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने यांच्या हस्ते करण्यात आला या प्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे, प्रा. संजय सावते व प्रा. राम गांगर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. २१ जून २०१५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या शिबीरास मार्गदर्शक म्हणून बीड येथील प्रसिद्ध योग शिक्षक श्रीमती जया बारगजे या लाभल्या होत्या. योवेळी बोलताना त्या म्हणाल्या की, योगा केल्यामुळे मानसिक ताण तणावातून मुक्ती मिळेल, योगा आरोग्यास उपयुक्त आहे. दैनंदिन जीवनामध्ये माणूस सतत ताणतणावामध्ये असतो याचे रहस्य योगात दडले आहे. या रहस्याचा उलगडा करताना योग आरोग्यास किती फायदेशीर आहे याची माहिती देऊन योग आसणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने, उपप्राचार्य डॉ. तुपे एस.के., रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे, प्रा. संजय सावते यांची प्रमुख उपस्थिती होती यांच्यासह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी योग आसणाच्या प्रात्यक्षिकात सहभाग नोंदवला.

दि. १ ऑगस्ट २०१५ रोजी महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांची जयंती रासेयो विभागच्या वतीने साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे दै. लोकमतचे तालुका प्रतिनिधी विजयकुमार गाडेकर होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी.बी. दशमाने या होत्या याप्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या की, युगपुरूषांच्या साहित्यातून सामाजिक बांधिलकी व समाजाच्या व्यथा वेदना मांडण्याचे काम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांनी केले आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक रासेयो विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर सुत्रसंचलन कु. अश्विनी पुरी व रामसिंग गडदे यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार सागर बनसोडे या स्वयंसेवकाने मानले. याप्रसंगी स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि. १५ ऑगस्ट २०१५ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रभात फेरी काढून स्वयंसेवकांनी रक्तदान केले.

दि. १७ सप्टेंबर २०१६ रोजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करण्यात आला यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. तर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने, उपप्राचार्य डॉ. एस.के. तुपे, प्रा. राम गांगर्डे, डॉ. शाम सानप, कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे, प्रा. संजय सावते, प्रा. उद्धव चौधर यांची प्रमुख



Scanned by CamScanner

उपस्थिती होती.

दि. २३ सप्टेंबर २०१६ रोजी महाविद्यालयात रासेयो दिन स्वच्छता अभियानाने साजरा करण्यात आला यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर सुशोभित केला.

दि. ३ ऑक्टोबर २०१५ रोजी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय समारोपात बोलतांना प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने म्हणाल्या की, राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे विचार राष्ट्रहिताचे होते म. गांधीजींनी आपले जीवन त्यागात घालवले. वाढता भौतिकवाद व चंगळवादावर मात करण्यासाठी यांचे विचार आवश्यक आहेत असे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा. विठ्ठल गुंडे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बी.टी. पवार उपप्राचार्य डॉ. एस.के. तुपे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. राम गांगर्डे यांनी केले तर उपस्थित मान्वरांचे आभार प्रा. नवनाथ पवळे यांनी मानले या कार्यक्रमासाठी प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते याप्रसंगी श्रमदान करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी महाविद्यालय सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. शिरूर कासार या गावात शारदीय नवरात्र महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. महाविद्यालयाचा रासेयो विभाग व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कॅल्शियम तपासणी कार्यक्रम कालिकादेवी मंदिरात घेण्यात आली. याप्रसंगी बीड येथील स्त्रीरोग तज्ञ डॉ. उज्वला शिंदे व संतोष शिंदे यांनी ही तपासणी केली. जवळपास १८४ महिलांची आरोग्य तपासणी केली याप्रसंगी सत्कार समारंभ कार्यक्रम पार पडला तर प्रस्ताविक डॉ. डोंगळीकर सी.व्ही. यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. बंडू पवार, डॉ. सुधीर येवले, प्रा. उद्धव चौधर, साईनाथ आहेर, बाळू पवार, विठ्ठल तुपे, उमांकात खेडकर यांच्यासह स्वयंसेवकांनी यांनी कष्ट घतल.

सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांची जयंती महाविद्यालयात रासेयो विभागाच्या वतिने वृक्षारोपण करून साजरी करण्यात आली. महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण प्राचार्य डॉ.पी.बी देशमाने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी स्व. वसंतराव काळे स्वाभिमानी शिक्षण या ... कमवा आणि शिका या विभागाच्या स्वयंसेवकांनी वृक्षारोपणात मोलाचे योगदान दिले. याप्रसंगी कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांना प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने यांनी मार्गदर्शन केले व स्वयंसेवकांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

वंचितांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबरोबरच स्वातंत्र्याने दिलेले हक्क यांची माहिती व्हावी म्हणून मसनजोगी वस्तीवर रासेयो विभाग व अजिवन शिक्षण विस्तार सेवा विभागाच्या वतिने संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने होत्या तर प्रमुख पाहुणे साईराम गॅस एजन्सीचे संचालक राम कांबळे, दै. पुण्यनगरी तालुका प्रतिनिधी गोकुळ पवार, उपप्राचार्य डॉ. एस.के. तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. चेतना डोंगळीकर यांनी केले तर प्रस्ताविक विस्तार सेवा विभाग प्रमुख प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी मानले. याप्रसंगी डॉ. एस.के. तुपे, डॉ. सुधीर येवले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मसनजोगी महिला मुले व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थि होते.

दि. १ डिसेंबर २०१५ रोजी महाविद्यालयात रासेयो विभाग रेड रिबीन क्लब व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने या होत्या.



Scanned by CamScanner

तर प्रमुख पाहुणे शिरूर येथील प्रसिद्ध डॉ. प्रिती बडे व डॉ. शितल क्षीरसागर या होत्या. अध्यक्षीय समारोपात डॉ. देशमाने म्हणाल्या की, भारतासारख्या देशामध्ये शाळा महाविद्यालयामध्ये लैंगिक शिक्षणाचा अभाव असल्या कारणाने एड्ससारखे आजार होत आहेत. अशा रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी शाळा महाविद्यालयामध्ये पारंपारिक शिक्षणाबरोबरच लैंगिक शिक्षणाचीही गरज आहे. योग्य जीवन शैली आणि नितिमूल्यांची जोपासना केली तर अशा रोगांवर आळा घालता येईल असेही त्या म्हणाल्या डॉ. प्रिती बडे म्हणाल्या की, एड्स हा केवळ एकच रोग भयानक नाही तर सर्वच रोग भयानक आहेत. या सर्व रोगावर नियंत्रण ठेवायचे असेल तर आपल्यावर चांगल्या प्रकारे संस्कार झाले पाहिजेत असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. डोंगळीकर सी.व्ही. यांनी केले तर आभार यु. एन. चौधर यांनी मानले.

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा विधीमंडळ उपनेते आ.मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त रासेयो विभाग व पांडुरंग तांबे मित्रमंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले याप्रसंगी ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी उद्‌घाटन मुंबईचे माजी नगरसेवक जब्बार पठाण, शिरूरचे तहसीलदार सानप नाना, सतिश काटे, रमेश कातखडे, युवराज सोनवणे, ईम्रान पठाण इ.सह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. राजेश क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. तुपे एस.के. प्रा.महारूद्र डोंगरे, डॉ. अशोक घोळवे, प्रा. संजय सावते, प्रा. उद्धव चौधर, प्रा. डॉ.सुधीर येवले, डॉ. शाम सानप श्री शेळके यांनी परिश्रम घेतले.

दि. ४ जानेवारी २०१६ ते ११ जानेवारी २०१६ रोजी या कालावधीत रासेयोचे विशेष शिबीर घेण्यात आले.

# शिबीर कार्यअहवाल

म. गांधीजींच्या संकल्पनेतून मूर्त स्वरूपात उतरलेली संबंध भारत देशात तरूणांची लोकचळवळ म्हणून नामाभिदान झालेली राष्ट्रीय सेवा योजना ही तरूणांची चळवळ देशाच्या खेड्यापाड्यात ग्रामोद्धाराचे महत्तम कार्य करत आहे. हाच वसा घेऊन कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा रासेयो विभागाद्वारे आयोजित विशेष शिबीर कार्यक्रम मौजे पाडळी ता. शिरूर का. येथे दि. ४.१.२०१६ ते दि. ११.१.२०१६ या कालावधित समाज सुधारणेच्या हेतूने घेण्यात आले.

महाविद्यालयातील रासेयो विभागातून विशेष शिबीरासाठी १०० स्वयंसेवक विद्यार्थ्यांची विद्यापीठ मान्यता आहे या शंभर विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी विशेषत: तरूणांनी मिळून मौजे पाडळी गावचा सर्वांगिण विकासाचा आणि प्रबोधनाचा सप्ताह पार पाडला. यात समाज प्रबोधन व्यसन मुक्तीवरील किर्तन, व्यक्तिमत्व विकास पोषण आहाराची माहिती, या व्यक्तिमत्वपर प्रबोधन प्रात्यक्षिके विकासाबरोबरच ग्रामस्वच्छता, नाले सफाई, सांडपाण्याची व्यवस्था पाणंद मुक्तीसाठी प्रत्यक्ष प्रबोधन, वृक्षारोपनासाठी खड्डे, झाडांना आळे करणे, सर्वात महत्वपूर्ण काम म्हणजे जलयुक्त शिबीराचे शास्वत वनराई बंधाऱ्याची उभारणी इ. कामामुळे पाडळी गावच्या सर्वांगीण विकासाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम सुरू झाले.

दि. ५.१.२०१५ रोजी पाडळी हायस्कूल पाडळी या शाळच्या प्रांगणात रासोयो शिबीराच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम झाला शिरूर का. तहसील कार्यालयाचे उद्‌घाटक दंडाधिकारी मा. पवार होते तर प्रमुख पाहूणे आणि मार्गदर्शक जिल्हा समन्वयक डॉ. उषा माने होत्या तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य पी.बी. देशमाने होत्या याप्रसंगी व्यासपीठावर सरपंच महादेव कंठाळे, ग्रामस्वच्छतेचे राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक

Scanned by CamScanner

शिवाजी सानप, स्थानिक शाळेचे मुख्याध्यापक श्री एस.एस. खोले, प्रकाश इंगळे युवा कार्यकर्ते संतोष कंठाळे, माऊली सानप इ.ची उपस्थिती होती. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि ग्रामस्वच्छतेचे जनक संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून या शिबीराचे औपचारिक उद्घाटन झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटक तहसीलदार श्री पवार म्हणाले की, ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे धाडस हे तरूणांमध्ये असते तरूणांचे सळसळते तारूण्य ग्रामीण भागाच्या मातीला सोन्याचे दिवस आणतील. आज महाराष्ट्रात जलयुक्त शिबीर अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाला तरूणांनी आपल्या हातात घेतले आहे. मिळेल तेथुन जेसीबी, पोकलेन, ट्रॅक्टर, टिप्पर उपलबध करून हे अभियान यशस्वी करत आहेत. शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी बरोबरच महाविद्यालयाचा रासेयोच्या स्वयंसेवकांनीही या अभियानात मोलाचे योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी स्वयंसेवकांना केले. त्यांचे उद्घाटनपर भाषण विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्राबद्दल प्रेरणा निर्माण करणारे ठरले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना जिल्हा समन्वयक डॉ. उषा माने म्हणाल्या की, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्माण करण्याची शक्ती असते. त्यांच्या कल्पनांना मूर्तरूप देण्यासाठी समाज आणि इथली व्यवस्था अपयशी ठरते या अपयशामुळेच तरूणांची कार्यक्षमता वाया जाते, पण या कार्यक्षमतेला कार्यप्रवण करण्याची प्रेरणा रासोयो विभागात आहे. विद्यापीठ पातळीवर आणि महाविद्यालय पातळीवर रासोयोच्या स्वयंसेवकांनी भरीव योगदान दिलेले आहे. याच योगदानात ग्रामीण भागात फार मोठे काम मार्गी लागले आहे असेही त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांना रासेयो चे मूल्य सांगितले, राष्ट्राची उभारणी रक्तावर झालेली आहे ते तरूणांचे रक्त आणि कष्ट हेच देशाला प्रगतीपथावर घेऊन जाईल आणि त्यातूनच देश महासत्ता बनेल असेही त्या म्हणाल्या.

याप्रसंगी सरपंच प्रतिनिधी श्री संतोष कंठाळे यांनी रासेयो शिबीरासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने म्हणाल्या की, चार भिंतीतील शिक्षण हे बौद्धिक विकास घडवते मात्र रासेयोच्या शिबीरातील शिक्षण व्यक्तीमत्व घडवण्यासाठी फलद्रूप ठरते. स्वयंसेवकांना मिळालेली संधी सात दिवसात आपल्या व्यक्तिमत्वाला विकसित करण्यासठीची उर्जा संचय करावा, या उर्जेवर आपल्या व्यक्तिमत्वाचा आणि आयुष्याचा डोलारा उभा राहतो यामुळेच प्रेरणादायी आयुष्य जगण्याचे महत्वपूर्ण व्यासपीठ म्हणजे रासेयो आहे असेही त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाची रूपरेषा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी प्रस्ताविकात सांगितली त्याचबरोबर आजपर्यंत रासेयो शिबीराच्या गावाना शासन स्तरावरून दिले जाणारे विविध पुरस्कार मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. संजय सावते यांनी केले उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. उद्धव चौधर यांनी मानले.

दि. ६.१.२०१६ रोजी स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष काम करावयास सुरूवात केली सकाळी गावात प्रभातफेरी काढली. त्याचबरोबर ग्रामस्वच्छता केली. रस्त्याच्या कडेला गावातील नाल्यांचे पाणी साचले होते त्याचे डबके तयार झाल्यामुळे त्यात डासांची उत्पत्ती होत होती. त्या डबक्यांना प्रवाहित केले. त्यातील कचरा बाहेर काढला. गावात प्राथमिक शाळेच्या भोवतीचा परिसर स्वयंसेवकांनी सुशोभित केला गावाच्या कडेला उखंडे मोठ्या प्रमाणात साचले होते. त्या उखंड्यावरील केरकचरा एकत्रित करून तो स्वयंसेवकांनी जाळला आणि भारत माता की जय, महात्मा गांधी की जय अशा घोषणांनी परिसर दणानुन गेला होता. गावातील ग्रामस्थांनीही या कामात आपापल्या परिने हातभार लावला होता. दुपारी स्वयंसेवकांनी स्नान केले व जेवण करून त्यांच्या कार्यक्रमाच्या तयारीस लागले.

कृषि विभागाचे कृषि सहाय्यक श्री अर्जुन चव्हाण, बी.बी. बांगर, आर.बी. बांगर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. पी. एन. घोलप होते उपस्थित मान्यवरांचे आभार सचिन पालवे यांनी मानले

Scanned by CamScanner

दि. ६.१.२०१६ रोजी स्वयंसेवकांनी वनराई बंधारा बांधकामाचे काम हाती घेतले. गावात जलयुक्त शिवराचे मोठ्या प्रमाणात काम झाले आहे गावातील सामाजिक कार्यकर्ते माऊली सान्प यांनी वृक्षारोपन केले आहे जवळपास एक हजार वृक्ष लागवड केली आहे. त्याचे जतनही त्यांनी केले त्या सर्व वृक्षांना आळे करण्यात आले गावातील लोक घरातून उरलेले पाणी त्या झाडांना घालतात त्यामुळे गावात मोठ्या प्रमाणात वृक्षांची लागवड झाली आहे.

दि. ७.१.२०१६ रोजी संदिप ढाकणे यांचे आदर्श गाव संकंल्पना या विषयावर व्याख्यान झाले तर अध्यक्ष प्रा. संजय सावते हे होते.

दि. ८.१.२०१६ रोजी गावातील महिलांना बचतगटचे प्रशिक्षण देण्यात आले प्रशिक्षक म्हणून जयश्री चिपाडे यांनी मार्गदर्शन केले.

दि. ९.१.२०१६ रोजी प्रा. राम गांगर्डे, प्रा. रमेश लाहोटी यांनी जलसंवर्धनात पाण्याचे महत्व व कृषि अर्थशास्त्र या विषयावर व्याख्यान झाले दि. १०.१.२०१६ रोजी डॉ. सुषमा सानप, डॉ. प्रियंका जवरे यांचे तारूण्यातील आरोग्य या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्ष डॉ. शामा लोमटे या होत्या. दि. ११.१.२०१६ रोजी शिबीराचा समारोप डॉ. पी.बी. देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली झाला याप्रसंगी प्रमुख पाहुणे मा. वसंत बिवरे प्रसिद्ध कवी यांच्या उपस्थितीत झाला.

डॉ. अशोक घोळवे

कार्यक्रमाधिकारी

Scanned by CamScanner